


महाराष्ट्र शासन

राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा

RAJMATA JIJAU GOVERNMENT MEDICAL COLLEGE BULDHANA

District Women Hospital,TB Hospital Campus, Buldhana

Email-gmcbuldhana@gmail.com **Tel No. 07262-295112**

माहितीचा अधिकार


---

जा.क्रंराजिशावैमबु/आस्था १-२/प्राध्यापक,सहयोगी प्राध्या.सहा.प्रा./थेट मुलाखत/जाहिरात/१७९०/२०२६ दि. ०१/१०/२०२६

# जाहिरात

## (WALK-IN-INTERVIEW)

विषय - राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,बुलढाणा येथे कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या प्राध्यापक,सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक या पदांची जाहिरात प्रकाशित करण्याबाबत...

संदर्भ - १) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र. एलईसी-२०२४/प्र.क्र १८१/ वैसेवा-३, दिनांक २१ ऑगस्ट २०२४

२) The Gazette of India, CG-DL-E-०५०७२०२५-२६४३९९ Extraordinary part -III Section ४ NMC , New Delhi, Date - ३०/०६/२०२५ (MSR)

राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा येथे खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय अध्यापन व रुग्णसेवा याकरिता चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन (३६४ दिवसांकरिता) विषयातील प्राध्यापक,सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच वयाच्या ६९ वर्ष वयोगटाचे आतील राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी व अन्य क्षेत्रातील उमेदवारांना करार पध्दतीने नियुक्ती देण्यासाठी खालील प्रमाणे जाहिरात देण्यात येत आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज आवश्यक छायांकित शैक्षणिक प्रमाणपत्रासह दिनांक ०६/१०/२०२६ ते २२/१०/२०२६ या कालावधी मध्ये कार्यालयात सादर करावा व इच्छुक उमेदवारांची मुलाखत मा. अधिष्ठाता, राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा याच्याव्दारे होणार असून आपण सदर दिवशी मुलाखती करिता आवश्यक मुळ प्रमाणपत्रसह मा. अधिष्ठाता, राजिशावैम, बुलढाणा यांच्या दालनात उपस्थित राहावे.

| अ.क्रं | पदाचे नाव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मानधन प्रति महिना |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्राध्यापक | १३ | एनएमसी, नवी दिल्ली यांचे मानकानुसार | १) २,००,०००/- (बिगर सेवानिवृत्त) (शा.नि. १७.१२.२०१६ तरतुदीनुसार (सेवानिवृत्त)) |
| ०२ | सहयोगी प्राध्यापक | १३ | एनएमसी, नवी दिल्ली यांचे मानकानुसार | १) १,८५,०००/- (बिगर सेवानिवृत्त) (शा.नि. १७.१२.२०१६ तरतुदीनुसार (सेवानिवृत्त)) |
| | **एकूण पदे** | **२६** | | |

| | | |
|---|---|---|
| ०१ | उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी | दि. ०६/१०/२०२६ ते दि. २२/१०/२०२६ सकाळी ११.०० ते सायं.०५.०० वाजेपर्यंत (सुटीचे दिवस वगळून) |
| ०२ | मुलाखती दिनांक | दिनांक २६/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता |
| ०३ | मुलाखतीचे ठिकाण | परिषद हॉल राजमाता जिजाऊ शा.वैद्य.महाविद्यालय,बुलढाणा |
| ०४ | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदाकरिताचे आवेदन शुल्क रुपये २०० हे रोखशाखेमध्ये जमा करुन त्यांची शासकीय पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे | |

१. मुलाखतीसाठी उमेदवारांना वेगळे पत्र पाठवले जाणार नाही.

२. मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे (Original Documents) सादर करणे आवश्यक आहे.
३. मुलाखतीस स्वखर्चाने हजर राहावे लागेल त्याकरिता कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

**१. महत्वाची टीप :-**

१. उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
२. उमेदवाराचे वय नियुक्ती वेळेस कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.
३. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पद्धतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेने विहित केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

**२. नियम व अटी :-**

१. करार पद्धतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील तथापि सदरहू पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करून देण्याचे अधिकार मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना राहतील.
२. मुलाखतीव्दारे आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक पदासाठीच्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश मुलाखतीनंतर संचालनालय, वै.शि.व.सं. मुंबई यांचेकडून पारित करण्यात येतील.
३. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास गंभीर स्वरूपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.
४. करार पद्धतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकानुसार अध्यापन रुग्णसेवा व मा.अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.
५. वरील प्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.
६. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.
७. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तिक रजा अनुज्ञेय असतील.
८. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे किंवा माहिती आधारसामग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
९. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.
१०. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथ पत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारासच करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थी हित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.
११. बिगर सेवानिवृत्त गटातून करार पद्धतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.
१२. अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरिक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.
१३. सदर जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे किंवा सदरची जाहिरात पूर्णतः रद्द करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता, राजिशावैम, बुलढाणा याच्यांकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१४. नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग, मुंबई यांना राहतील.

१५. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१६. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१७. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१८. मुलाखतीला येताना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मूळ कागदपत्र सोबत आणणे बंधनकारक राहील.

१९. उमेदवारांना देय होणाऱ्या मानधनातून १०% टीडीएस, व्यवसाय कर रु २००/- (वार्षिक रु २५००) व रेव्युनी स्टॅप रु. १/- इतकी कपात करण्यात येईल.

२०. उमेदवारांना करार तत्वावर नियुक्ती मिळाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील (शिस्त व वर्तणूक) नियम लागू राहतील.

**३. <u>शैक्षणिक पात्रता :-</u>**

१. महाराष्ट्र आयुर्विज्ञान परिषद व भारतीय आयुर्विज्ञान परिषद नवी दिल्ली यांच्या मानकानुसार अर्हता प्राप्त.

२. महाराष्ट्र मेडिकल कौंसिल यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणी (Valid MMC Registration) असणे आवश्यक.

३. The Gazette of India, New Delhi, Date ३०-०६-२०२५ (MSR) यामध्ये दिलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार उमेदवाराची निवड करण्यात येणार आहे. त्याकरिता Gazette ची PDF Copy या जाहिरातीसोबतच महाविद्यालयाच्या संकेतस्थळ www.gmcbuldhana.com यावर अपलोड केलेली आहे तरी उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी सदर Gazette चे अवलोकन करुन अर्ज सादर करावे.

४. गुणांकन पध्दत - पदवीचे गुण, पदवीव्युत्तर पदवीचे गुण, अनुभव, शोधनिबंध, मुलाखत व इतर शैक्षणिक अर्हता या सर्वाचे गुण एकत्रीत करुन उमेदवारांची निवड करण्यात येईल.

**४. <u>टीप :-</u>**

**सदर जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पूर्णतः रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग, मुंबई यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.**

**(इच्छुक उमेदवारांनी जाहिरातीसोबत जोडलेला अर्जाच्या नमुण्यामध्ये आपली संपूर्ण माहिती सादर करण्यात यावी.)**

**स्वाक्षरीत**

**(डॉ. कैलास उ. झिने ),**
**अधिष्ठाता,**
**राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा.**

**<u>प्रति -</u>**

१. कार्यालयीन संकेतस्थळ, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
२. कार्यालयीन संकेतस्थळ, राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा.
३. सूचना फलक, राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा.

**<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर</u> -**

१. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग, मुंबई.
२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य याना सूचना फलकावर लावण्याकरिता सस्नेह सादर.

| अ.क्र. | विषय | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| | प्राध्यापक (Professor) | | |
| १ | शरिरक्रियाशास्त्र ( Physiology ) | | १ |
| २ | जिवरसायनशास्त्र ( Biochemistry) | | १ |
| ३ | औषधशास्त्र ( Pharmacology) | | १ |
| ४ | क्षय व उररोग ( T.B & Chest) | | १ |
| ५ | सुक्ष्मजिवशास्त्र ( Microbiology) | | १ |
| ६ | औषधवैद्यकशास्त्र (Gen. Medicine) | The Gazette of India, New Delhi, Date ३०-०६-२०२५ (MSR) यामध्ये दिलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार | १ |
| ७ | शल्यचिकित्साशास्त्र ( Gen. Surgery) | | १ |
| ८ | त्वचा व गुप्तरोग (Skin & VD) | | १ |
| ९ | मनोविकृतीशास्त्र (Psychiatry) | | १ |
| १० | स्त्रीरोग प्रसूतीशास्त्र ( OBGY) | | १ |
| ११ | बधिरीकरणशास्त्र (Anaesthesia) | | १ |
| १२ | जनऔषधवैद्यकशास्त्र (Community Medicine) | | १ |
| १३ | कान,नाक व घसाशास्त्र (E.N.T) | | १ |
| | | एकूण | १३ |

स्वाक्षरीत
(डॉ. कैलास उ. झिने ),
अधिष्ठाता,
राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, बुलढाणा.

| अ.क्र. | विषय | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| सहयोगी प्राध्यापक ( Associate Professor) | | | |
| १ | शरिररचनाशास्त्र (Anatomy) | The Gazette of India, New Delhi, Date ३०-०६-२०२५ (MSR) यामध्ये दिलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार | १ |
| २ | औषधवैद्यकशास्त्र (Gen. Medicine) | | २ |
| ३ | शल्यचिकित्साशास्त्र ( Gen. Surgery) | | २ |
| ४ | बधिरीकरणशास्त्र (Anaesthesia) | | २ |
| ५ | मनोविकृतीशास्त्र (Psychiatry) | | १ |
| ६ | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र (Opthlmalogy) | | १ |
| ७ | कान,नाक व घसाशास्त्र (E.N.T) | | १ |
| | | एकूण | १० |

स्वाक्षरीत
(डॉ. कैलास उ. झिने ),
अधिष्ठाता,
राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, बुलढाणा.

# तपासणी सुची

(संस्थेने भरावयाची माहिती......)

नाव – ................................................................... पद
.................................................................

संस्थेचे नाव
..................................................................................................................................

| अ.क्रं | आवश्यक कागदपत्रे | आहे/नाही व अभिप्राय |
|---|---|---|
| ०१ | एसएससी प्रमाणपत्र (दहावीची सनद) | |
| ०२ | शैक्षणिक अर्हता – एमबीबीएस (सर्व वर्ष) | |
| ०३ | शैक्षणिक अर्हता – एमडी/एमएस/डीएनबी/एमसीएच/पीएचडी | |
| ०४ | जन्मदिनांक व वय | |
| ०५ | सेवानिवृत्त दिनांक व संस्थेचे नाव | |
| ०६ | सद्या कार्यरत संस्थेचे नाव | |
| ०७ | अनुभव | |
| | सहाय्यक प्राध्यापक | |
| | सहयोगी प्राध्यापक | |
| | प्राध्यापक | |
| | एकूण | |
| ०८ | शोधनिबंध | |
| ०९ | अधिवास प्रमाणपत्र (डोमीसाईल) | |
| १० | राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र | |
| ११ | BCBR Certificate | |
| १२ | MET Certificate | |
| १३ | इतर शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र | |
| | | |
| १४ | पात्र/अपात्र | |

# *Application Details:

| | | | |
|---|---|---|---|
| Application No. | | Paste Here Resent Passport Photo | |
| Application Date | | | |
| ***Candidate Details** | | | |
| Application Category | | | |
| Name of the post | | | |
| Candidate Name | | | |
| Address | | | |
| Mobile No | | | |
| Email | | | |
| Name of the organization if you are serving in private and other sectors | | | |
| Retirement Date | | | |
| Approved retirement Salary | | | |

## *Educational Details: #

| Sr. No. | Exam Name | Passing Year | Board Name | Subject | Exam Format | Total Makrs | Obtained Marks | % Per | Grade |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

## *Research Paper Details: #

| Sr.No. | Research Paper | National Publish Year | International Publish Year | First/Second Correspondence | Indexing |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## *Teaching Experience: #

| Sr.No | Post Name | Name of the University/Institute | From Date | To Date | Period in Year | Period in Month |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

*Educational Qualification, Research paper, Teaching Exp. And other Educational Document Attach with form

# If You Required Attach Extra Sheet

**(Candidate Name & Signature)**

## Declaration

Information furnished in this application form is complete and correct to the best of my knowledge and any proof contrary to this will make me liable for necessary disciplinary action.

Signature of Applicant

| Sr. no | List of documents/Certificated | Yes/No |
|---|---|---|
| 1 | Adhaar and Pan card | |
| 2 | SSC Certificate/ DOB Certificate | |
| 3 | UG Marksheets | |
| 4 | Internship completion certificate | |
| 5 | UG Attempt certificate | |
| 6 | MBBS Degree certificate | |
| 7 | UG Medical council Registratin/Renewal | |
| 8 | PG passing certificate/ Marksheets | |
| 9 | PG Attempt certificate issued by Dean/Competent authority | |
| 10 | PG Degree certificate | |
| 11 | PG Medical council Registration/Renewal | |
| 12 | Basic course in biomedical research Certificate | |
| 13 | Experience Certificates | |
| 14 | Copy of certificate awarded for research paper | |
| 15 | Domicile certificate issued by competent authority | |
| 16 | Caste certificate issues by competent authority | |
| 17 | Self-declaration letter regarding not working in any other government institute/department | |
| 18 | NOC from current employer in case of working in government /semi govt./ Autonomous Medical/Dental college | |
| 19 | MET Certificate | |
| 20 | Others if any | |